'गोविज्ञान भारतीय शेतीला वरदान'

कु. प्रतिक्षा सुरेशराव पवार
इतिहास विभाग
मारीया आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज, देवळी, जिल्हा – वर्धा.
pratikshappawar2002@gmail.com

सारांश –

भारतीय गायीचे शेण आणि गोमूत्र याचा नैसर्गिक खत आणि कीटकनाशक म्हणून शेतकऱ्यांना उपयोगी ठरतो याच्या वापराने जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीची सुपीकता वाढते. या शिवाय गायीपासून प्राप्त होत असलेल्या दूध, तूप, लोणी इत्यादी दुग्धजन्य पदार्थांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना पूरक व्यवसायातून आर्थिक विकास साधता येतो. गोविज्ञानाचा तंत्रज्ञानात्मक उपयोग करून आजच्या तरूणांना व महिलांना रोजगाार प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे. या शिवाय केंद्र शासन व राज्य शासनाद्ववारे गोरक्षण, गोसवंर्धन व गोविज्ञानास चालना मिळावी व शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे या करिता सुरू केलेल्या योजनांचा व प्रशिक्षणाचा योग्य वापर केल्यास याचा मोठा फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला होईल यात तिळमात्र शंका नाही.

महत्वपूर्ण भाब्द – गोविज्ञान, भारतीय परंपरागत शेती, रासायनिक शेती, कृषी विकास, पूरक व्यवसाय.

प्रास्ताविक –

'गोविज्ञान हे भारतीय शेतीला पूरक असे फारमोठे योगदान आहे. याची विविध कारणे आहेत. दिवसेंदिवस सुपिक शेतीचे रूपांतर हे नापिक शेतजमीनीमध्ये होत चालले आहे. जमिनीतील मातीचा पोत घसरत आहे. त्याचे कारण म्हणजे रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात करण्यात येत असलेला वापर. या किटकनाशंकांच्या वापरातुन जमिन इतकी प्रदुषित झाली आहे की, शेतकऱ्यांच्या पिकांच्या वाढीत घट झालेली आहे. जर शेतजमिनीचा कस, पोत पुर्वीसारखाच करायचा असेल तर रासायनिक किटकनाशक तसेच रासायनिक खतांचा वापर टाळून गोपालन तसेच जैविक सेंद्रिय खतांच्या वापराकडे वळले पाहीज. शेतकऱ्याच्या उत्पन्नात आणि आरोग्यात सुधारण्यात व आर्थिक विकासात वाढ करायची असेल तर गो पालनाची नितांत गरज आहे.

गोविज्ञान म्हणजे काय ?

गोविज्ञान म्हणजे देशातील देशी गाईचे करण्यात येत असलेले संगोपन, गो विज्ञान हा गो संगोपनातून निर्माण झालेले एक प्रकारचे विज्ञान आहे असे आपणास म्हणता येईल कारण गायीपासून मिळणाऱ्या विविध उत्पादनांचा ज्यामध्ये दूध, दही, तूप, शेण, गोमूत्र ज्यालाच पंचगव्य असे संबोधल जाते. या पंचगव्याचा मानवी आरोग्य, शेती आणि पर्यावरणासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करून त्याचा सुयाग्य वापर करणे होय. याचे एक उदाहरण म्हणजे गो विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार ता. रामटेक जि. नागपूर येथील संस्थेत गायीच्या

गोमूत्र आणि शेणात असलेल्या औषधी गुणधर्मांवर संशोधन करून, कर्करोग, मधुमेह यांसारख्या आजारांवर उपचार तसेच सेंद्रिय शेतीसाठी आणि उपयुक्त उत्पादने विकसित करण्याचे कार्य केले जाते. भारतीय चिकित्सा पद्धती असलेल्या आयुर्वेदानुसार गाईचे दूध, दही, तूप, गोमूत्र आणि शेण या पाच घटकांपासून बनवलेले औषध (पंचगव्य) महत्वपूर्ण मानले जाते. इतकेच नव्हे तर गाईच्या शेण आणि गोमूत्रापासून कंपोस्ट खत, कीटकनाशक ज्याला जीवाम्त म्हटले जाते याचा योग्य प्रमाणात उपयोग करून जमिनीचा कस वाढविला जातो. यावरून आपणास गोविज्ञानाचा उद्देश हा उपयुक्त असलेल्या गाईंची कत्तल थांबवून त्यांचे संरक्षण करणे, मानवास रसायनमुक्त अन्न आणि आयुर्वेदिक औषधोपचार पुरवणे. याशिवाय शेतकरी आणि गोशाळांना आर्थिक सक्षमीकरणाकरिता विविध अशा गो–उत्पादनांच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवणे हा आहे. थोडक्यात, गोविज्ञान हे भारतीय परंपरागत अशा गो पालनास आधुनिक विज्ञानाची जोड देऊन या माध्यमातून शाश्वत विकासाचा एक मार्ग आहे.

गोपालनाचे विविध लाभ

नैसर्गिक संसाधनांची जुळवाजुळव करून कमी खर्चामध्ये उत्तम शेती आणि पूरक जोडधंदा म्हणुन गो पालन हा एक महत्वपूर्ण आधार आहे. त्याचप्रमाणे गायी पासुन वायुरूपांतर इंधन आणि गोमूत्रापासुन औषधी निर्माण इत्यादीपासुन इ. स. 2024 पर्यंत भारतीय शेतक-याच्या उत्पादनात दिडपट वाढ करून देण्याचे केंद्र सरकारने शेतक-यांना जे आश्वासन दिले आहे. त्याची परीपुर्ती करण्यासाठीच्या अनेक प्रयत्नापैकी 'राष्ट्रीय कामधेन् आयोग' ची स्थापना हा एक शाश्वत प्रयत्न आहे. हा प्रयत्न आत्ताच्या परीस्थितीत शेतीला उर्जितावस्था प्राप्त करून देण्याच्या मार्गातील मैलाचा दगड आहे. त्यामुळ केंद्रसरकारची 'राष्ट्रीय कामधेनू' आयोगाची स्थापना किंवा कल्पना निव्वळ खुळचट व धार्मिक अवडंबर करण्याकरीता आहे, असे समजणे अत्यंत चुकीचे आहे. भारत सरकारने गोविज्ञानाचे महत्व लक्षात घेऊनच 'राष्ट्रीय कामधेनू' आयोगाची स्थापना करण्याची कल्पना केली.

गोविज्ञान हे शेतीला वरदान तर आहेच, कारण गोपालन केल तर त्याचे कोणतेच घटक निरर्थक न जाता सर्व घटक उपयोगात येणारे आहे. जसे की, गायीचे शेण शेतजमिनीला एक सेंद्रिय खत म्हणून उपयोगी आहे कारण याचा योग्य उपयोग शेतजमीनीकरिता उपयुक्त असाच आहे. तसेच गायीचे गोमूत्र यापासुन सेद्रिय किटकनाशके, फवारणी बनवून त्याचा योग्य वापर केल्यास सेंद्रिय खत म्हणून करता येतो. हे झाले शेतीपयोगी गोविज्ञान, परंतु सर्वसामान्य मानवाच्या दैनंदिन जीवनात देखिल गोविज्ञानाचा खूप मोलाचा उपयोग होतो. उदा. धार्मिक पूजाविधो मध्ये प्रकीया केलेले रसायनांचा वापर करून तयार केलेल्या धुपबत्तीचा वापर न करता जर गोमातेच्या शेणाचा वापर करून पर्यावरणास व मानवाला हानीकारक नसलेल्या धुपबत्त्या आपण घरात किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी धार्मिक कार्यात वापर केल्यास याद्वारे आपण आपले वातावरण भाुद्ध ठेवू शकतो. तसेच गोधनापासून मिळालेल्या वायू इंधनाचा वापर पाहिजे त्या प्रमाणात होत नसल्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात आले आहे याचे एक कारण म्हणजे घरगुती आणि सार्वजनिक स्वंयपकात मोठया प्रमाणात होत असलेला एल. पी. जी. वायुचा वापर.

भारतीय संस्कृती आणि गोपालनाचा सहसंबंध

वैदिक संस्कृतीमध्ये श्रीमंतीचे किंवा वरीष्ठतेचे प्रतिक कोणते होते? तर ते म्हणजे ज्या व्यक्तीकडे जेवढ जास्त गोधन तेवढाच तो श्रीमंत म्हणजे त्याचे गोधनावरून त्याची पद, श्रीमंती ठरविण्यात येत असे. वैदिक संस्कृतीत शेतीला दुग्धजन्य जोडव्यवसाय सुद्धा गोमातेपासून

मिळायचा. तेव्हाचे लोक हे गोधनाचे महत्व जाणून होते त्यामुळेच त्याकाळातील समृद्धी भारतीय शेतीला लाभलेल्या गोपालनात होती असे म्हणता यईल.

संस्कृत वाङःमयात असे काही श्लोक सांगीतले आहे की, त्यामधून 'गाईची' महती मांडण्याचे कार्य करते. 'गो' चा आध्यामिक दृष्टया अर्थ सांगायचा झाला तर



असा दोन्ही प्रकारे घेता येतो. पुराणामध्ये 'गाय' संबंधाने अनेक प्रकारचे भाष्य केलेली आहे.

रासायनिक शेतीला पर्याय – गोधन आधारित भोती

भारमामध्ये जवळपास 8.42 अब्ज (142 कोटी) च्या दरम्यान लोक राहतात. त्यापैकी कीती लोक किंवा शेतकरी जमिनीसाठी गोविज्ञानाचा वापर करीत आहे. आणि त्या उलट किती टक्के लोक रासायनिक शेती करून जमीन प्रदुषित करीत आहे. याचा जर अंदाज घेतो म्हटल तर जास्तीत जास्त शेतकरी जमीनीत उत्पन्न घेतांना रासायनिक किटकनाशके, रासायनिक खते वारतात तर, या उलट कमीत कमी संख्येत लोक गोविज्ञानाचा वापर करून आपली शेती सुपिक करण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा जगात चिकीत्सा शास्त्राची परंपरा नव्हती, तेव्हा तक्षशीला विश्व विद्यालयात आयुर्वेद अनुसंधान केंद्र प्रगतीच्या सर्वोच्च स्थानी होते. या वरून लक्षात येते की, भारत किती प्रगतशील देश होता. तसेच आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यास गोविज्ञानाची फार मोठी भुमीका आहे. ते म्हणजें असे की, रासायनिक शेतीच्या कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी गो आधारीत अगदी झिरो बजेट नैसर्गिक शेती (BNG) खुप प्रभावी आहे. जर या पद्धतीचा वापर शेतकरी वर्गाने केला तर रासायनिक खते, औषधांमध्ये जाणारा भरघोस पैसा वाचले व परीणामतः शेतक-यांना कर्ज काढण्याची गरज पडणार नाही व कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याची वेळ शेतक-यांवर येणार नाही. यांचा चांगला फायदा म्हणजे शेतकरी आनंदी, सुखी संसार थाटू शकेल.

गोपालनातून आर्थिक विकास व शारीरिक सुदृढता

वर्तमान परिस्थितीत संपूर्ण देशातील चित्र पाहिल्यास असे लक्षात येते की, खेडोपाडी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यांचा हाताला काम नाही. जर हे गोविज्ञान समजून घेतले आणि पंचगव्यापासुन गोमई उत्पादने, खत निर्मीती करून नविन सेंद्रीय शेती यासारखा पूरक आणि मदतगार ठरणारा व्यवसाय उभारला तर नक्कीच या बरोजगार तरुणांची बेराजगारी दूर होण्यास काही प्रमाणात मदत होईल. महीलांनी गोविज्ञानातुन गोमूत्र व शेणापासून वेगवेगळ्या वस्तु उदा. (धूपबत्ती, साबण, फिनाईल) अशा सामग्री तयार करून आपले सक्षमीकरण केले आहे. याचे एक उदाहरण म्हणजे पालघर जिल्हयातील आदिवासी वर्ग हा गो आधारीत शेती करतो त्यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती चांगली आहे. पालघर जिल्हयातील सेंद्रिय शेतीचे फायदे आपणास दिसून येतात ते म्हणजे शेतीकरिता कमी खर्च, शेतीतून प्राप्त मालाची उत्तम गुणवत्ता, जमीनीचा कस कायम,

आर्थिक स्वालंबन इत्यादी. या वरून लक्षात येते की, आदीवासी समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती उत्तम आहे. पालघर मधील विषेतः डहाणु, तालासरी, जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड, पालघर आणि वसई तालुक्यात आदिवासी शेतकरी हा पारंपरीक सोबतच सेंद्रिय शेतीकडे वळलेला आहे. यावरून आपणास शेतीचा आणि गाईपासून प्राप्त होणाऱ्या उत्पादनांचा आर्थिक विकासातील सहभाग लक्षात येतो. यावरून भोतीचा आणि पशूधनाचा खुप निकटचा संबंध आहे.

आजच्या वर्तूमान परिस्थितीत आपण आपल्या डोळयासमोर बघतो की, आज रासायनिक औषधांची फवारणी केलेले फळे, भाजीपाला सर्रास बाजारपेठेत विकला जातो. शेतीवर तर याचा दुष्परीणाम होतोच आपल्या शरीरारावर देखील याचा भयंकर वाईट परीणाम होत आहे. आणि काळाच्या ओघात आणखी वाढेल यात काही शंकाच नाही. परंतू याउलट सेंद्रीय शेतीतून जर हे उत्पन्न घेतले तर या अन्न पदार्थांचा कोणताही वाईट परीणाम तर होणारच नाही. उलट याचा चांगला आणि आरोग्य दायी फायदा दिसून येईल. या सेंद्रिय शेतीतील अन्नाच्या वापरामुळे भारत देश हा कुपोषण मुक्त राहण्यास खूप मोलाची भूमिका पार पाडू शकते. उदा. देशी गायीच्या दुधाचा आणि दुग्धजन्य उत्पादनांचा ग्रामीण भागातील बालकांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. गोविज्ञानाच्या वापरातून केल्या जाणाऱ्या शेतीमुळे जमीनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कायम राहते. यामुळे पाण्याचा तुटवडा पडण्याचे प्रमाण कमी होवून शेतकऱ्यांना दुष्काळास तोंड देण्याची गरज पडणार नाही.

गोसवंर्धनाकरिता महाराष्ट्र शासनाच्या विशेष योजना

महाराष्ट्र राज्यामध्ये देशी गोवंश संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या बिगर सरकारी संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोग गठित करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम 2023 अधिनियमित असून दि. 08.04.2023. रोजी तो शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला व दि. 10.05.2023 रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्यात लागू करण्यात आला या आयोगाचे राज्यात कार्यान्वयन दिनांक 7.7.2023 पासून सुरू झाले आहे. आयोगाचे मुख्य कार्यालय, पशुसंवर्धन आयुक्तालय, आषैंध, पुणे –67 येथे आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगााच्या योजना

कृषि,पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी काढलेल्या शासन निर्णय क्रमांक पविआ –1124/प्र.क्र. 184/पदुम–3 नुसार महाराष्ट्रातील गोशाळांच्या माध्यमातून आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने नोंदणीकृत गोशाळांमधील देशी गाईच्या पोषणासाठी गोशाळांना प्रति दिन 50 रूपये अनुदान योजना लागू केली आहे. या योजनेचा उद्देश गोशाळांना आर्थिक मदत करणे आणि देशी गायींच्या पालनपोषणाला चालना देणे. या योजनेच्या अंतर्गत अनुदान मिळवण्यासाठी

- ज्या गोशाळा महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत आहेत.
- ज्या संस्थांकडे मागील तीन वर्षांचा लेखापरीक्षण अहवाल आहे.
- गोशाळा, गोसदन, पाळणारा आणि गोरक्षण संस्था पात्र ठरतील.
- गोशाळेला कमीतकमी तीन वर्षांचा अनुभव असावा लागेल आणि त्यात 50 गोवंश असणे आवश्यक आहे.

- गोवंशीय पशुंची ईअर टॅगिंग अनिवार्य असून, या प्रक्रियेमुळेच अनुदानासाठी पात्रता सिद्ध केली जाईल.
- संबंधित संस्थेस राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

या योजनात्मक उपक्रमामुळे गोशाळांच्या आर्थिक स्थैर्याला हातभार लागेल आणि देशी गायींच्या संरक्षणाला प्रोत्साहन मिळेल.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाची प्रशिक्षणे

महाराष्ट्र गोसेवा आयोगाची प्रशिक्षण हे गोवंश संरक्षण, सेंद्रिय शेती, दुग्धव्यवसाय आणि पशुपालनाच्या विविध पैलूंवर आधारित आहेत. हे प्रशिक्षण शेतकऱ्यांना गोपालन, दूध उत्पादन, आणि पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञान या करिता असून यामध्ये आर्थिक साक्षरता, कृषी प्रक्रिया उद्योग, पशुधन व्यवस्थापन, आणि ग्रामीण विकासासह आत्मनिर्भरतेच्या मार्गदर्शनाचे शिक्षण दिले जाते.

गोशाळा संचालकांसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षणे

महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम 2023 अन्वये निर्देशित केलेले उद्देश सर्व गोशाळेचे पदाधिकरी व संचालकांपर्यन्त पोहोचवणे या उद्देशाने महाराष्ट्र राज्यामधील 34 जिल्ह्यात जिल्हास्तरीय एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणा अंतर्गत गोशाळा स्थापनेचा उद्देश, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, गोशाळेतील गोवंशचे टॅगिंग, गोशाळा मधील पशुधनाचे आरोग्य व चारा व्यवस्थापन, गोशाळा गोपालन व संवर्धन, गोशाळा व्यवस्थापन, गोशाळा पंचगव्य उत्पादन, गोशाळा देशी गोवंश संवर्धन व रक्षण, गोशाळा स्वावलंबन, गोशाळातील शेती व्यवस्थापन, गोशाळा कार्यालय व्यवस्थापन, गोशाळा दानदाता संपर्क, सरकारी अधिकारी संपर्क, गोशाळेत आवश्यक कागदपत्रे व अभिलेखे, गोशाळा मधील विविध कार्यक्रम, उपक्रम, उत्सव व गोशाळा प्रचार प्रसार अश्या विविध विषयांवर प्रशिक्षण देणे आवश्यक असल्यामुळे त्यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात (प्रत्येक गोशाळा कमाल 2 प्रतिनिधी प्रमाणे) गोशाळा पदाधिकारी व संचालकाचे एक दिवशीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येत आहेत.

गोपालकांसाठी तालुकास्तरीय प्रशिक्षणे

महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम 2023 अन्वये निर्देशित केलेले उद्देश सर्व गोपालन करणारे पशुपालकापर्यन्त पोहोचवणे या उद्देशाने महाराष्ट्रातील एकूण 220 तालुक्यांमध्ये प्रती तालुका 50 प्रमाणे तालुक्यातील पशुपालक, गोशाळा, महिला बचत गटातील सदस्य, फार्मा प्रॉड्यूसर कंपनी तसेच स्थानीय गोपालन करणारे शेतकरी व पशुपालक यांचे एक दिवशीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. सदर प्रशिक्षणा अंतर्गत गोशाळा स्थापनेचा उद्देश, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, गोशाळेतील गोवंशचे टॅगिंग, गोशाळा मधील पशुधनाचे आरोग्य व चारा व्यवस्थापन, गोशाळा गोपालन व संवर्धन, गोशाळा व्यवस्थापन, गोशाळा पंचगव्य उत्पादन, गोशाळा देशी गोवंश संवर्धन व रक्षण, गोशाळा स्वावलंबन, गोशाळातील शेती व्यवस्थापन, गोशाळा कार्यालय व्यवस्थापन, गोशाळा दानदाता संपर्क, सरकारी अधिकारी संपर्क, गोशाळेत आवश्यक कागदपत्रे व अभिलेखे, गोशाळा मधील विविध कार्यक्रम, उपक्रम,, उत्सव व गोशाळांचा प्रचार प्रसार अशा विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात येत आहे.

निष्कर्ष –

गोविज्ञान भारतीय शेतीला वरदान आहे हे माहित असून काही लोकांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. भारतात प्राचीन युगापासून गाईला अनन्यसाधारण महत्व आहे. गायींपासून मिळणाऱ्या पंचगव्याचा व्यवस्थित उपयोग केल्यास त्यापासून केवळ शारीरिकच नव्हे तर आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत होईल यात भांका नाही. भारतीय परंपरागत कृषी व्यवसायास आधुंनिक पूरक अशा गोपालन व्यवसायाची मदत झाल्यास यामधून निश्चितच तरूण पिढीला गोविज्ञानाचे महत्व लक्षात येईल व ते नवीन तंत्रज्ञानयुक्त व्यवसाय करून आर्थिक विकासाला हातभार लावतील यामुळे बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल. हा सकारात्मक बदल घडवून आणण्याकरिता मात्र आजच्या युवकास गोविज्ञानाचे तंत्र याशिवाय महाराष्ट्र गोसेवा आयोगाद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचा अभ्यास करून त्याआधारे गोसंवर्धन चळवळ सक्षम करण्यास हातभार लावणे गरजेचे आहे. तेव्हाच गोविज्ञान हे भारतीय शेतीला वरदान ठरेल.

संदर्भ सूची –

1) ॲग्रोवन, शेतकरी नियोजन – गोपालन, https://agrowon.esakal.com/animal-care/animal diseases/farmer-planning-gopalan-ds236

2) राष्ट्रीय गोवंश संरक्षण आणि संवर्धन बोर्डची प्रकाशने

3) डॉ. चित्रलेखा पुरंदरे, सेंद्रिय शेतीची यशोगाथा.

4) महाराष्ट्र गोसेवा आयोग, https://www.mahagosevaayog.org/

5) राजेंद्र भट, शाश्वत नैसर्गिक शेती,, सकाळ प्रकाशन

6) ना. प. दक्षिणकर, समग्र पशुसंवर्धन (हॅन्ड बुक ऑफ अनिमल हजबंड्री), श्री मंगेश प्रकाशन